**Sakal, Pune, Aug 29 2012**

# प्रश्नमंजूषा स्पर्धेत आर्मी स्कूल अव्वल



**यशवंतराव चव्हाण नाट्यगृह : टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे आयोजित 'टीसीएस आय टी विझ २०१२' या आंतरशालेय प्रश्नमंजूषा स्पर्धेतील आर्मी पब्लिक स्कूलचे विद्यार्थी (डावीकडून) ज्ञानेंद्र मिश्रा व सिद्धार्थ आग्रवाल.**

**पुणे, ता. २८ :** स्पर्धेसाठीची उत्सुकता... एकमेकांवर मात करण्यासाठी चाललेली चढाओढ... उत्तरासाठी स्पर्धकांची चाललेली धडपड... अचूक उत्तर आल्यावर विद्यार्थ्यांनी केलेला जल्लोष अन् आनंद... अशी उत्कंठावर्धक स्पर्धा सुरू असतानाच शेवटच्या फेरीत विखे पाटील आणि आर्मी पब्लिक स्कूल या दोन संघांची बरोबरी झाली. तब्बल तीन वेळा प्रश्न विचारण्यात आल्यावरही दोन्ही संघांची बरोबरी कायम होती. पुढे काय होणार, याची उत्सुकता प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून येत होती. अखेर स्पर्धा जिंकली आर्मी पब्लिक स्कूलने.

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे 'टीसीएस आय टी विझ २०१२' या आंतरशालेय प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील प्रश्न माहिती-तंत्रज्ञानावर आधारित होते. ही स्पर्धा १४ शहरांमधील वेगवेगळ्या शाळा-महाविद्यालयांमध्ये घेण्यात येणार आहे. या चौदा शहरांतील विजेते स्पर्धक राष्ट्रीय विजेतेपदाच्या अंतिम स्पर्धेत सहभागी होणार आहेत. अंतिम फेरी डिसेंबर महिन्यात चेन्नई येथे होईल. यामध्ये शहर पातळीवरील स्पर्धेत डॉ. कलमाडी श्यामराव, ऑर्किड स्कूल, फर्ग्युसन महाविद्यालय, दिल्ली पब्लिक स्कूल, विखे पाटील स्कूल आणि आर्मी पब्लिक स्कूल या शाळांतील प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांचा संघ स्पर्धेत सहभागी झाले होते. यामध्ये आर्मी पब्लिक स्कूलच्या ज्ञानेंद्र मिश्रा (१२ वी) आणि सिद्धार्थ आग्रवाल (११ वी) यांनी प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकावले. विखे पाटील स्कूलच्या जयनंदन गेज्जी (१२ वी), कृणाल तवकर (११ वी) यांनी उपविजेतेपद पटकावले. या वेळी संगणक अभियांत्रिकी शाखा आणि माहिती-तंत्रज्ञान विभागाचे विभागप्रमुख डॉ. जगन्नाथ आघाव, अरुण बहुलकर, अरविंद पाध्ये उपस्थित होते. गिरी बालसुब्रमण्यम यांनी स्पर्धेतील प्रश्न विद्यार्थ्यांना विचारले.